प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर, पहिला माळा, बी विंग, वनभवन, सिव्हील लाईन्स, नागपूर - 440 001,
दूरध्वनी क्र.(0712) 2530166, 2556916 फॅक्स क्र. (0712) 2550675 ई मेल- apccfnodal@mahaforest.gov.in

क्रमांक : कक्ष-17/नोडल/ठाणे/आयडी-13727(NH)/२७० /2022-23
नागपूर - 440 001, दिनांक:- २४/०४/२०२३

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा),
ठाणे

**विषय:-** वनजमिन-रायगड
राष्ट्रीय महामार्ग-166 डी, पेण-खोपोली-महाड (कि.मी.00+000) ते कि.मी. 33 + 328 ), या रस्त्याच्या कामासाठी रायगड जिल्हयातील 9.9249 हे. वनजमीन वळतेकरणेबाबत...

**संदर्भ:-** शासन पत्र क्रमांक एफएलडी-1323/प्र.क्र.124/फ-10, दिनांक 21/04/2023

उपरोक्त विषयांकित प्रकरणी, संदर्भिय शासन पत्रान्वये 1 ते 4 मुदयांवर त्रुटीपूर्तता अहवाल सादर करण्यास या कार्यालयात कळविण्यात आले. सदरील पत्राची पत्र पूढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहे.

2.00 तरी आपणास कळविण्यात येते की, वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत शासन संदर्भिय पत्रावये उपस्थित 1 ते 4 मुदयांचे अनूषंगाने मुददेनिहाय अहवाल आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासह व संपूर्ण दस्तऐवजासह या कार्यालयात सादर करण्यात यावा. जेणेकरून सदरील त्रुटीपूर्तता अहवाल शासनास सादर करणे सोईचे होईल.

**सहपत्र:- वरीलप्रमाणे**

24/4/23

(नरेश झुरमुरे)
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी**

प्रतिलिपी:- प्रधान सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय मुंबई-32 यांना माहीतीस साद

प्रतिलिपी:- उपवनसंरक्षक, अलिबाग वनविभाग, अलिबाग यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

प्रतिलिपी:- कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग पेण-रायगड यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

महत्वाचे

जा.क्र.कक्ष-10/वसं/प्र.क्र.28/22-23/ 72 /2023-24
ठाणे - 400 603, दिनांक - 04/05/2023.

प्रतिलिपी- उप वनसंरक्षक, अलिबाग यांना माहिति व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
प्रतिलिपी- कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, पेण रायगड यांना माहिति व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

(एस. आर. गि-हे)
प्रशासकीय अधिकारी, ठाणे
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांचे कार्यालय

महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-१३२३/प्र.क्र.१२४/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २१ एप्रिल, २०२३

प्रति,

अपर मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

विषय:- वनजमिन – रायगड
राष्ट्रीय महामार्ग-१६६डी, पेण-खोपोली-महाड (कि.मी. ००+००० ते कि.मी. ३३ + ३२८), या रस्त्याच्या कामासाठी रायगड जिल्ह्यातील ९.९२४९ हे. वनजमीन वळतेकरणेबाबत...

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/ठाणे/ID-१३७२७ (NH) / १७५२ /२२-२३, दि. १३.०३.२०२३

संदर्भाधीन दिनांक-१३.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय महामार्ग-१६६डी, पेण-खोपोली-महाड (कि.मी. ००+००० ते कि.मी. ३३ + ३२८), या रस्त्याच्या कामासाठी रायगड जिल्ह्यातील ९.९२४९ हे. वनजमीन वळतेकरणेबाबत प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

२. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खाली नमूद मुद्यांची माहिती आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायांसह शासनास तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

१) उपवनसंरक्षक, अलिबाग यांनी ऑनलाईन पार्ट-२ मध्ये अ.क्र. २ येथे वळतीकरणासाठी प्रस्तावित जमिन ९.८८५५ आणि अ.क्र. ३ व ४ येथे ९.४२४९ असे नमूद केले आहे. सबब, त्यामध्ये ९.९२४९ अशी सुधारणा करून ऑनलाईन पार्ट-२ सादर करावा.

२) प्रस्तावित जमिनीच्या बहुतांश ७/१२ उताऱ्यावर खाजगी व्यक्तींची नावे आहेत. तसेच ७/१२ उताऱ्यावर भोगवटादार वर्ग-२, कुळ कायद्याने प्राप्त जमिन, हेटवणे प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी व कालव्यासाठी भूसंपादन कलम-४ अन्वये संपादित जमिन, वन अधिनियम कलम ३५ मधून मुक्त, बाळगंगा नदी प्रकल्पासाठी संपादित, संरक्षित कुळ, पेण-खोपोली रस्ता रुंदीकरणासाठी संपादित क्षेत्र अशा प्रकारच्या नोंदी आहेत. मौजे पिंपळगाव आणि गागोदे बुद्रुक येथील खाजगी वनजमिन चौकशीवर प्रलंबीत असा शेरा लिहून, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळतीकरणासाठी प्रस्तावित केली आहे. सदर जमिन वनजमिन असल्याचा कोणताही उल्लेख ७/१२ उताऱ्यावर दिसून येत नाही. त्यामुळे सदर जमिनीला वन

357
24/4/23

(संवर्धन) अधिनियम, १९८० च्या तरतुदी लागू होतात किंवा कसे, याबाबत पुनश्चः तपासणी करून, माहिती सादर करावी.

३) प्रकल्प यंत्रणेने खाजगी हक्क धारकांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करावे.

४) वळतीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे पिंपळगाव, गट नं. २७/२, ३०, मौजे कामार्ली, सर्व्हे नं. ४४pt., आणि गागोदे खुर्द, गट नं. ८, १३२, १४१बी येथील तसेच पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या मौजे. शिहू, ता. रोहा, कक्ष नं. २०९ येथील क्षेत्राचे अधिकार अभिलेख सादर करावेत.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन